# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२११०/१८८/१३२
ईमेल: secretary@msbte.com संकेतस्थळ : www.msbte.org.in

जा. क्र. मरातंशिमं/का-४३/उ.प.२०२०/२०२०/ 017 दिनांक – 21 JAN 2021

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित संस्था

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी (Enrollment) व त्यांचे हिवाळी -२०२० परिक्षा करीताचे अर्ज भरण्याकरीताचे वेळापत्रक**

**संदर्भ:** Academic Calendar वर्ष २०२०-२१ - MSBTE/D-40/Academic Calendar/B2/2020/0107, Dt. 08/12/2020

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये **नविन प्रवेशित (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष)** विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन नोंदणी अर्ज संस्थास्तरावर निश्चित करुन हिवाळी - २०२० साठी परीक्षा अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक:

| अनु. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १. | संस्थास्तरावर नोंदणी निश्चित करुन नियमित शुल्कासह परिक्षा अर्ज भरणे | दि. २२/०१/२०२१ ते दि. २९/०१/२०२१ |
| २. | नियमित शुल्क + रु. २००/- दंडासह परिक्षा अर्ज भरणे | दि. ३०/०१/२०२१ ते दि. ०१/०२/२०२१ |
| ३. | विभागीय कार्यालय स्तरावर नोंदणी अर्ज व परिक्षा अर्ज निश्चिती | दि. ०१/०२/२०२१ ते दि. ०३/०२/२०२१ |
| **विभागीय कार्यालय स्तरावर परिक्षा अर्ज अंतिम निश्चिती - दि. ०३/०२/२०२१ रोजी सायं. ४ वाजेपर्यंत** | | |

**नोंदणी प्रक्रिया व परिक्षा अर्ज भरण्याबाबत सूचना:**

१) **AICTE अभ्यासक्रमासाठी DTE Portal वर अपलोड केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांनाच नोंदणी करता येईल. अशा पात्र विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज संस्थास्तरावर निश्चित (Confirm) केल्यानंतर लगेचच त्या विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२० करीता परिक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील.**

२) नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय अधिकतम प्रवेशक्षमतेपर्यंत मर्यादित राहील. अधिकतम क्षमतेवरील विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी त्याच्या विशिष्ट प्रवर्गासाठी संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या परवानगीचे पत्र आवश्यक राहील.

३) इयत्ता १२ उत्तीर्ण झालेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षातील विषयामध्ये सूट द्यावयाची असल्यास संस्थेने विद्यार्थ्यांची इयत्ता १२ सायन्सची गुणपत्रिका पडताळणी करून Online Link मध्ये माहीती भरून विभागीय कार्यालयात अर्ज निश्चित करावयाचा आहे व त्यानंतरच सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निश्चित करावे.

D20
21/01/2021

उप सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ
प्रा. का. नागपूर.
आवक क्रं..... 125
दिनांक..21 JAN 2021

४) ऑनलाईन प्रक्रियेत विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) हा महत्त्वाचा टप्पा असून सदर प्रक्रिया अचूकतेने करण्यात यावी. विशेषतः विद्यार्थ्यांचे नाव हे शालांत परीक्षेच्या प्रमाणपत्राप्रमाणेच असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या नावामध्ये बदल असल्यास मंडळाचे परीक्षा विषयक नियमावलीनुसार RG-१५ (पृष्ठ क्र. २३) नुसार कार्यवाही करावी.

५) विद्यार्थ्यांची नोंदणी करतांना फोटोसह स्वाक्षरी असलेली अचूक इमेज अपलोड करणे बंधनकारक आहे. केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून प्राप्त फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज चांगल्या प्रतीची नसल्यास त्याऐवजी नवीन स्कॅन केलेली फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज अपलोड करण्यात यावी. नोंदणी प्रक्रियेनंतर इमेज (फोटोसह स्वाक्षरी) बदलासाठी मंडळाकडे अर्ज केल्यास रु. ५००/- दंड आकारुनच नोंदणी झालेल्या विद्यार्थाचे फोटोसह स्वाक्षरी मध्ये बदल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीचे (Non-AICTE) अभ्यासक्रमातील नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रीया पूर्ण झाली असून उपरोक्त नमूद कालावधीत नविन नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे हिवाळी २०२० परीक्षा अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.**

विद्यार्थ्यांची नोंदणी करतांना तसेच परीक्षा अर्ज भरतांना, संस्थांना कोणतीही अडचण आल्यास Institute login मधील मेसेज सिस्टीमद्वारे मंडळाशी संपर्क साधावा.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी वर नमूद कालावधीमध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी करून त्यांचे हिवाळी परिक्षा – २०२० करीताचे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयात निश्चित करावेत. विभागीय कार्यालय यांच्यामार्फत निश्चित झालेले परीक्षा अर्जच हिवाळी परिक्षा-२०२० करीता ग्राह्य धरण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत –

१) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.

२) उपसचिव, म. रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता

पृष्ठ क्र. मरांतशिमं/विकाना/का-३१/२०२१/61
दि. २१-०१-२०२१

प्रत:

प्राचार्य, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत, नागपूर व अमरावती विभागातील सर्व संस्था यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी व त्यांचे हिवाळी-२०२० परीक्षा करीताचे अर्ज भरण्याकरीताचे वेळापत्रक आपल्या माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

(श्रीमती. कांचन शे.मानकर)
उपसचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
विभागीय कार्यालय, नागपूर